d 391

जा क्र. मनपा/नरवि/रेखांकन/ ४२२६/१९९३
कार्यालय महानगरपालिका, औरंगाबाद
दिनांक :- २५/ ११ /१९९३

आ दे श.

श्री/श्रीमती - सेक्रेटरी संजय को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी
यांनी मोहल्ला/मौजे - - शहानुरवाडी - (उस्मानपुरा) - - - - - - -
गेरिल नगर भूमापन क्र./~~स.नं./मल नं.~~/- - ९६३२५ - - - - - - - - -
मधील दाखल केलेल्या रेखांकनास - - - - - रंगाने दुरुस्ती केल्याप्रमाणे सुधारित
अंतिम मंजूरी खालील अटी वर दिलि जाते :==

१. सर्व भूखंडाचा वापर निवासासाठी करण्यात यावा.

२. रेखांकनामधील प्रत्येकी स्वतंत्र भूखंडाचे क्षेत्र २५० चौ. मि. पेक्षा कमी असू नयेत व सेमी डिटॅच भूखंडाचे क्षेत्र १२५ चौ. मि. पेक्षा कमी असू नये .

३. मंजूर केलेल्या भूखंडास पुन्हा पोट विभागणी करुन देण्यात येणार नाही.

४. रेखांकन मधील खुली जागा कायमची खुली जागा ठेवाची लागेल.

५. श्री /श्रीमती सोसायटी तर्फे सेक्रेटरी अशोक पुंडलिकराव पाटील यांनी रेखांकनामधील अंतर्गत रस्ते व खुल्या जागेचे हस्तांतर महानगरपालिकेस दुय्यम निबंधक [नोंदणी] यांच्या कार्यालयात नोंदणी क्र.- - ९०६८- - - - - - दिनांक- २०-२-८५ आधारे करुन दिलेली आहे. तथापी आता सुधारित रेखांकन .*

६. भूखंडामध्ये बांधकाम, नियमाप्रमाणे या कार्यालयाची परवानगी घेऊन करण्यात यावे. तसेच करण्यात येणारे बांधकाम , बांधकाम उपविधी [ बिल्डींग बाय लॉज ] नियंत्रण नियमावली [ डेव्हलपमेंट कंट्रोल ] रूलच्या अनुषंगाने करावे लागेल.

७. भविष्यात रहदारीच्या दृष्टीकोनातून आणखी रस्ता रुंदीसाठी जागेची गरज भासल्यास ती भूमिसंपादन कायदा आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार संपादन करण्यात येईल. मात्र सोसायटीस/भूखंड धारकास नियमाप्रमाणे मोबदला दिला जाईल.

पुढे चालु... पृ. पान क्र. २ वर पहावे..

*. दाखल झाल्याने खुल्या जागेपैकी काही क्षेत्राच्या स्थानात व क्षेत्रात आणि आकारात बदल झालेला असल्यामुळे आता पुन्हा श्री अशोक पुंडलिक पाटील सचिव संजय गृह निर्माण संस्था यांनी दुय्यम निबंधक यांचेकडील अ.क्र. 2023 दिनांक २५/११/९३ अन्वये सुधारित Relinquishment deed जे रेखांकनातील खुल्या जागे पोटी २५ ९/- मुल्य देऊन महानगरपालिकेस हस्तांतर करुन दिले आहे.

C/393



८] विकास कामे सुरु करण्यापूर्वी / भुखंडावर बांधकाम परवानगी घेण्यापूर्वी रेखांकनाच्या जागेचे सपाटीकरण करुन द्यावे लागेल.

९] भूखंडामधील बांधकाम परवानगी घेण्यापूर्वी प्रत्यक्ष जागेवरील भूखंडाचा नकाशा नगर भूमापन कार्यालयातून तयार करुन द्यावा लागेल.

१०] भूखंडातून महानगरपालिकेच्या मालकीची पाण्याची लाईन/भूमिगत गटार गेलेली असेल तरी ती स्वखर्चाने स्थलांतर करुन द्यावी लागेल.

११] नैसर्गिकरित्या वाहणाऱ्या पाण्याचा प्रवाह जर भूखंडातून जात असेल तर भूखंडाच्या एका बाजूने भूमिगत पाईप लाईन, गटारीसाठी मार्ग मोकळा करुन द्यावा लागेल त्यासाठी कोणत्याहि प्रकारचा मोबदला दिला जाणार नाही.

१२] महानगरपालिकेने वेळोवेळी विकास खर्च [बेटरमेन्ट चार्जेस] सुधारित केल्यास त्यानुसार भूखंडधारकास विकास खर्च[बेटरमेन्ट चार्जेस] बांधकाम परवानगी मिळण्यापूर्वी भरावी लागेल.

१४] सदरील अर्जदाराच्या रेखांकनावर या कार्यालयाने एकूण विकास ~~खर्च रक्कम रुपये~~ त्या ५० टक्के रक्कम भरणा केलेली आहे त्याची नोंद आदेश ~~त्याची~~ क्रमांक AMC/TPS/८४/४५९/८५ दि. ७-२-८५ मध्ये घेतली आहे. ~~आकारण्यात आला असून त्यापैकी अर्जदाराने विकास खर्च रक्कम रुपये~~ - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - -

[५० टक्के ] या कार्यालयात जमा केली आहे. व बाकी विकास खर्च रक्कम रुपये - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - -

[५० टक्के ] भूखंडधारकाकडून बांधकाम परवानगीचे वेळी त्या वेळेच्या विकास खर्चाच्या सुधारित दराने भरावी लागेल.

१५] सदर जागेसाठी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे कडील आदेश क्रमांक जमाबंदी/कार्यासन-२/एनएटी-एन/८६ दिनांक २२.७.१९८७ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषी परवानगी घेतलेली आहे - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - -

चालु... कृ. पान क्र. ३ वर पहावे

C/395

१६] सदर सुधारित रेखांकनात भुखंड क्र. ३,८,९,१४, १६,१८,२३,२५ व ४० च्या हद्दीत व स्थानात बदल झाल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना (दुरुस्ती) अधिनियम १९९२ चे ~~...~~ तरतुदी प्रमाणे भुखंड क्षेत्राच्या रु २०/- प्रति चौरस मिटर प्रमाणे रु ३५३२०/- विकास शुल्क जमा करुन घेण्यात आलेले आहे - - - - - - - - - - - - - -

१७] - या जागेसाठी आता सुधारित रेखांकनास अंतिम मंजूरी दिल्यामुळे ~~...~~ दिनांक २०-२-८९ रोजी AMC/TPS/LT/L-459/89 मंजूर केलेले रेखांकन याद्वारे रद्द करण्यात येत आहे - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. आयुक्तांची प्रशासकांची
तजविज दि.

[signature]

आयुक्त प्रशासक
महानगरपालिका औरंगाबाद करिता.

प्रत :=

१. मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहिती व अकृषिक प्रमाण पत्र संबधी योग्य कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रषित.

२. श्री/श्रीमती चेअरमन / सचिव संजय गृहनिर्माण संस्था शहानूरवाडी औरंगाबाद - - - - - - - - - - - - - - - - - - -

३. शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद

४. मालमत्ता अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांना अंतर्गत रस्ते व खुली जागा नगर भुमापन कार्यालयात नावांची नोंद करुन घेण्यास्तव दिली जाते.

५. मुळ संचिकेसाठी.

-=:::xx:::=-

Received Layout order with map

कादीर/
१४९२